Out — 263 Dt. 24 Dec 2019


महाराष्ट्र शासन

**पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय**

सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई - ४०० ००१

ई-मेल mahaarchaeology@gmail.com | दूरध्वनी क्र. ०२२ २२६२३३८०


जा.क्र. संग्रहालय २०१९ /२०/ 2633 | दिनांक : 24 DEC 2019

## परिपत्रक

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारीत येणाऱ्या १३ वस्तुसंग्रहालयांना पर्यटक, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, संशोधक व सामान्य नागरिक इत्यादी संग्रहालय बघण्यासाठी भेट देतात आणि त्यासाठी आपण त्यांना प्रवेश शुल्क आकारतो. मात्र आपल्या संग्रहालयांचे प्रवेश शुल्क हे १९६० पासून बदलेले नाही तरी त्यासंदर्भात संचालनालयाने खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे दरनिश्चिती केली असून संचालनालयाच्या अधिनस्त सर्व संग्रहालयांना या दरसूची प्रमाणे प्रवेश शुल्क आकारण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

सदर प्रवेश शुल्क दर शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. शासनाची मंजुरी प्राप्त होईपर्यंत खालील प्रमाणे प्रवेश शुल्क आकारण्यात यावेत. हे प्रवेश शुल्क शासकीय विहित पद्धतीनुसार तसेच रोख स्वरूपात जमा करण्यात यावे. या कार्याची रीतसर नोंदवही राखण्यात यावी आणि त्याबाबतचा सविस्तर अहवाल (अभिप्राय नोंदवहीच्या छायांकीत प्रत, जमा शुल्क, भेट देणारे नागरिक यांची संख्या इत्यादी) महिन्याअखेरीस या संचालनालयाला सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | १५ वर्षाखालील लहान मुले / शालेय विद्यार्थी | रु. १/- |
| २ | महाविद्यालयीन विद्यार्थी (ओळखपत्रासहित) | रु. ५/- |
| ३ | १५ वर्षावरील मुले व प्रौढ (भारतीय नागरिक, बिमस्टेक- BIMSTEC व सार्क - SAARC देशाचे नागरिक) | रु. १०/- |
| ४ | परदेशी नागरिक | रु. १००/- |

जागतिक वारसा दिवस, वारसा सप्ताह आणि संग्रहालय दिवस या साठी संग्रहालयामध्ये विनामूल्य प्रवेश देण्यात यावा. मात्र त्याबाबतचा सविस्तर अहवाल (भेट देणारे नागरिक यांची संख्या इत्यादी) या संचालनालयाला सादर करण्यात यावा.

संग्रहालयातर्फे इतर कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतील तर त्यासाठी आणि विनामूल्य संग्रहालय प्रवेशाकरिता संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

(डॉ. तेजस म. गर्गे)
संचालक
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये
महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीकरिता:

१. अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर
२. अभिरक्षक, सरकारवाडा प्रादेशिक संग्रहालय, नाशिक
३. अभिरक्षक, शासकीय संग्रहालय, माहूर
४. अभिरक्षक, थिबा पॅलेस संग्रहालय, रत्नागिरी
५. अभिरक्षक, शासकीय संग्रहालय, सिंदखेडराजा
६. अभिरक्षक, श्री.बाळासाहेब पाटील शासकीय संग्रहालय, पैठण
७. उपअभिरक्षक, श्री.भवानी चित्रसंग्रहालय आणि ग्रंथालय, औंध, सातारा
८. सहाय्यक अभिरक्षक, चंद्रकांत मांडरे संग्रहालय, कोल्हापूर
९. सहाय्यक अभिरक्षक, टाउन हॉल संग्रहालय, कोल्हापूर
१०. सहाय्यक अभिरक्षक, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, सातारा
११. सहाय्यक अभिरक्षक, सोनेरी महाल संग्रहालय, औरंगाबाद
१२. सहाय्यक अभिरक्षक, कै. रामलिंग अप्पा संग्रहालय, तेर
१३. सहाय्यक अभिरक्षक, शासकीय संग्रहालय, सांगली